## ८. अर्थव्यवस्था आणि व्यवसाय

प्रश्न १ : कारणे लिहा

१. राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत अमेरिकेची संयुक्त संस्थाने हा देश ब्राझील व भारतापेक्षा खूप पुढे आहे.
२. ब्राझीलची उच्चभूमी व किनारी प्रदेशात विविध प्रकारची पिके घेतली जातात.
३. ब्राझीलच्या अंतर्गत भागात खाणकाम व्यवसाय विकसित झाला नाही.
४. ब्राझीलला दक्षिण अटलांटिक किनाऱ्यालगत मासेमारीचे उत्कृष्ट क्षेत्र लाभले आहे.
५. ब्राझीलमध्ये दक्षिण अटलांटिक किनाऱ्यालगत मासेमारी व्यवसाय चालतो.
६. ब्राझीलमध्ये गोड्या पाण्यातील मासेमारी विकसित झालेली नाही.
७. भारताचा ६०% भूभाग लागवडीचा आहे.
८. भारताच्या अर्थव्यवस्थेत मत्स्यव्यवसायची भूमिका महत्त्वाची आहे.
९. भारतामध्ये उद्योगांचे असमान वितरण झाले आहे.
१०. भारतीय द्वीपकल्पाच्या ईशान्य भागात धातू निर्मितीचे उद्योग वसलेले आहेत.
११. ब्राझीलला 'जगाचा कॉफी पॉट' असे संबोधले जाते.
१२. ब्राझील मध्ये दरडोई जमीनधारणा भारताच्या तुलनेत जास्त आहे.
१३. भारत व ब्राझील या दोन्ही देशांमध्ये मिश्र अर्थव्यवस्था आहे.

**प्रश्न २ रा. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. ब्राझीलच्या पश्चिम भागात खाणकाम व्यवसायाचा विकास अल्प झाला आहे?

२. कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही कोणत्या घटकांवर अवलंबून असते?

३. ब्राझील हा देश कोणकोणत्या उद्योगात अग्रेसर आहे?

४. भारत आणि ब्राझील हे देश कोणकोणत्या बाबतीत प्रगती पथावर आहेत?

५. ब्राझीलचा पूर्व भाग कोणकोणत्या संपत्तीने संपन्न आहे?

६. भारतात कोणकोणत्या प्रकारची पिके घेतली जातात?

७. भारतात मत्स्य व्यवसायाचा उपयोग कशाकरिता होतो?

८. आहारात मासेमारी हा घटक असणारी भारतातील राज्ये कोणती?

९. ब्राझीलमधील विकसित झालेले उद्योग कोणकोणते आहेत ते लिहा.

१०. भारतात कोणकोणती तेल शुद्धीकरण केंद्रे आहेत? भारतात तेल शुद्धीकरण केंद्रे प्रामुख्याने कोठे आहेत?

११. भारतातील मोठ्या प्रमाणात मीठ उत्पादन करणारी राज्ये कोणती?

१२. मोठ्या शहरातून कोणकोणत्या उद्योगांचे केंद्रीकरण झालेले आढळते?

१३. ब्राझीलमधून कोणकोणत्या वस्तूंची निर्यात केली जाते?

१४. ब्राझीलमधून कोणकोणत्या वस्तूंची आयात केली जाते?

१५. ब्राझीलचे प्रमुख व्यापारी भागीदार असलेले देश कोणते आहेत?

१६. भारत कोणकोणत्या देशांशी व्यापारी भागीदारी करतो?

१७. भारतातून प्रामुख्याने कोणकोणत्या वस्तूंची निर्यात केली जाते?

१८. भारतातून प्रामुख्याने कोणकोणत्या वस्तूंची आयात केली जाते?

१९. भारतीय कंपन्यांनी ब्राझीलमधल्या कोणकोणत्या क्षेत्रात गुंतवणूक केली आहे?